जनसंपर्क कक्ष
15 JUL 2023 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्याय न देणाऱ्या कायद्याच्या विरोधात लढले पाहिजे

प्रतिनिधी
कोल्हापूर

समता, स्वातंत्र्य व बंधुभाव माणसाला कसा प्राप्त होऊ शकेल, यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा म्हणजे संविधान महत्त्वाचे मानले. कायदा माणसाला न्याय देत नसेल तर अशा कायद्याच्या विरोधात लोकांनी लढले पाहिजे असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. हरीष भालेराव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने आयोजित प्राचार्य डॉ. दिनकर खाबडे लिखित

■ माजी प्राचार्य डॉ. हरिष भालेराव यांचे प्रतिपादन

'सामाजिक सुधारणा चळवळ आणि मानवी समानता आणि न्यायासाठी डॉ. आंबेडकरांचे बौद्धिक समर्थन' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू शिर्के म्हणाले, डॉ. खाबडे यांनी डॉ. आंबेडकरांच्या विचारांबाबत केलेले विश्लेषण संशोधनास योग्य दिशा देणारे आहे. डॉ. आंबेडकरांचे ग्रंथप्रेम हे त्यांना बौद्धिक समर्थनाकडे घेऊन गेले. लेखक प्राचार्य दिनकर खाबडे म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या बौद्धिक विचारांवर पाश्चात्य विचारवंतांचा मोठा प्रभाव होता. या पुस्तकामध्ये त्यांनी ज्यांना आदर्श मानले अशा विचारवंतांचा आढावा घेतला आहे. प्रास्ताविक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. सूत्रसंचालन प्रा. अविनाश भाले यांनी केले. यावेळी दूरशिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, डॉ. किशोर खिलारे आदी उपस्थित होते.



कोल्हापूर : प्राचार्य डॉ. दिनकर खाबडे लिखित पुस्तकाचे प्रकाशन करताना प्राचार्य डॉ. हरीष भालेराव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी.

# 'दूरशिक्षण'च्या विद्यार्थ्यांनी गिरवले परदेशी विद्यापीठातून कौशल्याचे धडे

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १४ : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातील एम. कॉम.च्या विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठातील कौशल्याचे धडे गिरविले आहेत.

कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रमाअंतर्गत दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या एम. कॉम. भाग १ सत्र २ च्या विद्यार्थांनी इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड या डिजिटल प्लॅटफॉर्मवरून 'मार्केटिंग इन अ डिजिटल वर्ल्ड' हा युनिव्हर्सिटी ऑफ लल्रिणोईस ॲट अर्बन - कॉम्पेन ॲंड ऑफर्ड थ्रो कोर्सेरा तसेच एम. कॉम. भाग १ सत्र २ मधील विद्यार्थांनी 'एक्सेल स्किल्स फॉर बिझनेस : इंटरमेडीयट' हा मक्युएरिय युनिव्हर्सिटी ॲंड ऑफर्ड थ्रो कोर्सेरा या परदेशी विद्यापीठाच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमासाठी एकूण १८४३ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली. इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड या डिजिटल पोर्टलच्या माध्यमातून परदेशी विद्यापीठाच्या कौशल्य प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे धडे गिरवले. अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, सी. एस. कोतमिरे, समन्वयक डॉ. के. बी. पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. कोर्स समन्वयक म्हणून डॉ. पी. एन. देवळी यांनी काम पाहिले. वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्याशाखा अधिष्ठाता प्रा. डॉ. एस. एस. महाजन यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी डॉ. एस. एस. भोला, शर्वरी कुलकर्णी, प्रतिभा जगताप आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : डॉ. एस. एस. महाजन यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरण करण्यात आले. यावेळी शेजारी डॉ. एस. एस. भोला, शर्वरी कुलकर्णी, प्रतिभा जगताप, डी. के. मोरे, सी. एस. कोतमिरे, के. बी. पाटील, पी. एन. देवळी, आदी उपस्थित होते.**

> दूरशिक्षण केंद्रांतर्गत विद्यार्थ्यांसाठी कौशल्य वृद्धिंगत प्रमाणपत्र अभ्यासक्रम इन्फोसिस स्प्रिंग बोर्ड या डिजिटल प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून अभिनव उपक्रम राबवण्यात आला. या माध्यमातून विद्यार्थ्यांनी परदेशी विद्यापीठाचे कौशल्य आधारित कोर्स पूर्ण केल्यास रोजगारच्या संधी निश्चित प्राप्त होतील.
> **- डॉ. डी. के. मोरे,** संचालक, दूरशिक्षण शिक्षण केंद्र

> कौशल्य वृद्धिंगत अभ्यासक्रम पूर्ण केल्याने डिजिटल व जीवन कौशल्य आम्हा विद्यार्थ्यांना प्राप्त झाली आहेत. त्यामुळे याचा फायदा भविष्यात निश्चित होणार आहे.
> **- प्रियांका पाडळकर,** विद्यार्थिनी

लोकमत

# दूरशिक्षण केंद्रातर्फे प्रवेश प्रक्रियेसाठी आज कार्यशाळा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाइन शिक्षण केंद्राच्यावतीने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ८६ अभ्यास केंद्रांतील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी आज शनिवारी सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे आयोजन केल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. विद्यापीठातील सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल समन्वयक डॉ. आर. डी. पडवळ यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन होणार आहे. उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

पुढारी

# 'दूरशिक्षण'च्या प्रवेशप्रक्रियेसाठी आज समन्वयक, लेखनिकांची कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रातर्फे कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ८६ अभ्यास केंद्रांतील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी शनिवारी (दि. १५) सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे आयोजन केल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. बी.ए., बी.कॉम., एम. ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास ), एम.कॉम., व एम. एस्सी. (गणित) अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. डॉ. आर. डी. पडवळ यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्‌घाटन होणार आहे. उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

तरुण भारत

# दूरशिक्षण केंद्रातर्फे प्रवेश प्रक्रियेसाठी समन्वयकांची आज कार्यशाळा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्यावतीने कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील ८६ अभ्यास केंद्रातील समन्वयक व लेखनिक यांच्यासाठी २०२३–२४ साठीच्या प्रवेश प्रक्रियेबाबत माहिती देण्यासाठी शनिवार, १५ रोजी सकाळी ११ वाजता कार्यशाळेचे आयोजन केल्याची माहिती संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे यांनी दिली. बी. ए., बी. कॉम., एम. ए., (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास), एम. कॉम., व एम. एस्सी. (गणित), या अभ्यासक्रमासाठी २०२३–२४ साठी प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. त्या अनुषंगाने ही कार्यशाळा होणार आहे. यावेळी शिवाजी विद्यापीठातील सेंट्रल ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेल समन्वयक डॉ. आर. डी. पडवळ यांच्या हस्ते कार्यशाळेचे उद्घाटन होणार असून उपकुलसचिव डॉ. एस. एम. कुबल, उपकुलसचिव सी. एस. कोतमिरे प्रमुख उपस्थित असणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील महाविद्यालयातील अभ्यासकेंद्राच्या समन्वयक व लेखनिक यांनी या कार्यशाळेसाठी उपस्थित राहावे.

लोकमत

# रसायनशास्त्राची प्रवेश फेरी सोमवारी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागात आज, शनिवारी दुसरी प्रवेश फेरी आयोजित केली होती. तथापि, काही तांत्रिक कारणास्तव दुसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया सोमवारी होणार असल्याचे अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी सांगितले.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र अधिविभागात उद्या दुसरी प्रवेश फेरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागामध्ये सोमवार (दि.१७) रोजी दुसरी प्रवेश फेरी आयोजित करण्यात आली आहे. यापूर्वी, शनिवारी (दि.१५) दुसरी प्रवेश फेरी आयोजित करण्यात आली होती. तथापि, काही तांत्रिक कारणास्तव दुसऱ्या फेरीची प्रवेश प्रक्रिया सोमवारी होणार आहे. याची विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी, असे आवाहन अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी केले आहे.

पुढारी

*कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ भूगोल विभागातर्फे सुरू केलेल्या पर्यटन व प्रवास पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू केली आहे. पदवीधर तसेच अभियांत्रिकी डिप्लोमाधारकांना अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो. तरी इच्छुकांनीं भूगोल विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पुढारी

# विद्यापीठाच्या वतीने २३ अभ्यासक्रमांच्या पुनर्परीक्षा मंगळवारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने मंगळवार, १८ जुलै रोजी विविध २३ अभ्यासक्रमांच्या पुनर्परीक्षा सकाळी १० ते सायंकाळी ५ या तीन सत्रांत घेण्यात येणार आहेत. विद्यापीठातर्फे एम.एस्सी. बॉटनी, फिजिक्स, झूलॉजी, इलेक्ट्रॉनिक्स, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी, बॅचलर ऑफ जर्नालिझम, बी.एस्सी., एम.एस्सी. (इकोनॉमिक्स), मास्टर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ जर्नालिझम, बी.लिब. अँड इन्फॉर्मेशन सायन्स, एमसीए (कॉम्प्युटर सायन्स), एम.ए. मास कम्युनिकेशन, एमए रशियन, एमबीए (रुरल मॅनेजमेंट) या अभ्यासक्रमांच्या परीक्षा होणार आहेत. याबाबतचे परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याची माहिती प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठाच्या फेरप्रवेश परीक्षा मंगळवारी

प्रतिनिधी
कोल्हापूर

■ २३ अभ्यासक्रमांचा समावेश : वेळापत्रक जाहीर

शिवाजी विद्यापीठाच्या चालू शैक्षणिक वर्षातील २३ अभ्यासक्रमांसाठी मंगळवार १८ जुलै रोजी फेरप्रवेश (पुनर्प्रवेश) परीक्षांचे आयोजन केले आहे. सकाळी १०.३० ते १२, दुपारी १ ते २.३० आणि दुपारी ३.३० ते ५ वाजेपर्यंत अशा तीन टप्प्यात परीक्षाचे वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. ही माहिती प्र. कुलसचिव-डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली. जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार संबंधित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी फेरप्रवेश परीक्षेला वेळेत उपस्थित राहावे, असे आवाहनही डॉ. शिंदे यांनी केले आहे.

मंगळवार १८ जुलै रोजी सकाळी १०.३० ते १२ यावेळेत फेरप्रवेश परीक्षा होणारे अभ्यासक्रम असे : एम.एसी. बॉटनी, एम.एसी. फिजिक्स, एम.एसी. झुलॉजी, एम.एसी. स्टॅटिस्टीक, एम. एसी. इलेक्ट्रॉनिक्स, मास्टर ऑफ टेक्नॉलॉजी (रूरल टेक्नॉलॉजी), बॅचलर ऑफ जर्नालिझम, बी. एससी. इकॉनॉमिक्स (इंटेग्रेटेड).

मंगळवार १८ रोजी दुपारी १ ते २.३० वेळेत परीक्षा होणारे अभ्यासक्रम असे : एम.एससी. मायक्रोबायोलॉजी, फार्मासिटिक्युल मायक्रो, जनरल मायक्रोबायोलॉजी, एम.एससी. मॅथेमॅटिक्स/ एम.एससी.(मॅथेमॅटिक्स वुईथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन), एमए/ एम.एससी. (जॉग्रॉफी), मास्टर ऑफ सोशल वर्क, मास्टर ऑफ जर्नालिझम, बी. लिफ अँड इन्फॉर्मेशन सायन्स, एमबीए इन रूरल मॅनेजमेंट, एमसीए (कॉम्प्युटर सायन्स).

मंगळवार १८ जुलै रोजी दुपारी ३.३० ते सायंकाळी ५ वेळेत फेरप्रवेश परीक्षा होणारे अभ्यासक्रम असे : एमए मास कम्युनिकेशन, एम. एससी. ॲग्रो केमिकल अँड पीस्ट मॅनेजमेंट, एम. एससी. एन्व्हायर्नमेंटल सायन्स, एम. एससी. कॉम्प्युटर सायन्स, एम.एससी. नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, एम. ए. रशियन, एम.एससी. बायोटेक्नॉलॉजी/ मेडिकल इन्फॉर्मेशन मॅनेजमेंट.

तरुण भारत

# रसायनशास्त्राची दुसरी प्रवेश फेरी सोमवारी

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागामध्ये शनिवारी १५ जुलैला दुसरी प्रवेश फेरी आयोजित केली होती. तथापि, काही तांत्रिक कारणास्तव या फेरीची प्रवेश प्रक्रिया सोमवारी १७ जुलै रोजी करण्यात येणार आहे, याची विद्यार्थी व पालकांनी नोंद घ्यावी, असे अधिविभागप्रमुख डॉ. कैलास सोनवणे यांनी सांगितले.